आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१९ डिसेंबर २०२५ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- संसदेचं हिवाळी अधिवेशन संस्थगित/ लोकसभेत १११ टक्के तर राज्यसभेत १२१ टक्के विधायक कामकाज

- राज्यातल्या २४ नगरपरिषदां- नगरपंचायतींसाठी उद्या मतदान

- माणिकराव कोकाटे यांचा मंत्रिपदाचा राजीनामा राज्यपालांनी स्वीकारला

**आणि**

- नागपूरच्या बुटीबोरी औद्योगिक वसाहतीत आज सकाळी पाण्याची टाकी कोसळून झालेल्या अपघातात किमान ३ जण ठार तर ३ जण जखमी

**<><><><><>**

संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज आज अनिश्चित काळासाठी तहकूब झालं.

- **- - बाईट- सभापती ओम बिरला - - -**

लोकसभेत सभापती ओम बिरला यांनी सांगितलं की या अधिवेशनात सभागृहाच्या १५ बैठका झाल्या आणि त्यात १११ टक्के विधायक कामकाज झालं.

राज्यसभेत सभागृहाच्या कामकाजात वारंवार व्यत्यय येत असल्याबद्दल अध्यक्ष सी पी राधाकृष्णन यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. सदस्यांनी आत्मपरीक्षण करावं असं आवाहन त्यांनी केलं. सभागृहात ९२ तास प्रत्यक्ष कामकाज झालं असून १२१ टक्के उत्पादकता राहीली, असं उपराष्ट्रपतींनी सांगितलं. जी-रामजी विधेयकावरच्या चर्चेसाठी मध्यरात्रीपर्यंत सभागृहाचं कामकाज चालल्याचा उल्लेख त्यांनी केला. सभागृहाचे अध्यक्ष या नात्याने आपलं पहिलंच अधिवेशन होतं असं सांगून राधाकृष्णन यांनी उपाध्यक्ष, तालिका सदस्य, सभागृह नेते, आणि विरोधी पक्ष नेते यांचे आभार मानले.

१ डिसेंबर पासून सुरु झालेल्या या हिवाळी अधिवेशनात वंदे मातरम्, निवडणूक सुधारणा, रोजगार, विमा क्षेत्रातल्या सुधारणा तसंच ऊर्जा सुरक्षा यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा झाली. या अधिवेशनात एकूण पाच महत्त्वाची विधेयकं मंजूर

करण्यात आली. त्यात विकसित भारत रोजगार हमी उपजीविका विधेयक, शांती विधेयक, विमा सुधारणा विधेयक तसंच निरसन आणि सुधारणा विधेयकांचा समावेश आहे.

दरम्यान, मनरेगा ऐवजी विबी जी-रामजी राबवण्याच्या विधेयका विरोधात विरोधीपक्षांच्या खासदारांनी आजही संसदभवन परिसरात निदर्शनं केली.

<><><><><>

दरम्यान, काल राज्यसभेत व्हीबी जी राम जी विधेयकावरील चर्चेदरम्यान झालेल्या गदारोळाप्रकरणी भाजपनं आठ खासदारांविरोधात हक्कभंग नोटीस दिली आहे. काँग्रेस, द्रमुक आणि तृणमूल काँग्रेसच्या खासदारांचं सभागृहातलं वर्तन लोकशाहीसाठी लाजीरवाणं असल्याचं भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी सांगितलं असून, या खासदारांना कामकाजात सहभागी होऊ देऊ नये, अशी मागणी त्यांनी केली.

<><><><><>

बदलत्या तंत्रज्ञानातली आव्हानं ओळखून जागतिक दर्जाचे सनदी अधिकारी घडवण्यावर लोक सेवा आयोगांनी लक्ष केंद्रित करावं असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. हैद्राबादमध्ये आयोजित देशातल्या लोकसेवा आयोगांच्या अध्यक्षांच्या राष्ट्रीय परिषदेचं उदघाटन करताना त्या आज बोलत होत्या.

**- - -होल्ड - बाईट - - -**

याआधी बोलताना तेलंगणाचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी सनदी अधिकाऱ्यांच्या भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणणे आणि भरती वेळापत्रक काटेकोरपणे राबविण्यावर भर दिला होता.

संघ लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष अजय कुमार आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

पारंपरिक औषधोपचार पद्धतींवर नवी दिल्लीत सुरू असलेल्या जागतिक आरोग्य संघटनेच्या आंतरराष्ट्रीय शिखर परिषदेचा आज समारोप होणार आहे. या समारोप समारंभात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अनेक आयुष उपक्रमांचा प्रारंभ केला जाणार आहे. 'माय आयुष' सर्वसमावेशक सेवा पोर्टल आणि आयुष मार्क या प्रमाणिकरणाचा यामधे

समावेश आहे. या कार्यक्रमात २०२१ ते २०२५ या काळात योग प्रसार आणि विकासामध्ये उल्लेखनीय काम केलेल्या व्यक्तींना प्रधानमंत्र्यांच्या हस्ते पुरस्कार दिला जाणार आहे.

<><><><><>

राज्यातल्या २४ नगर परिषदा आणि नगर पंचायती तसंच १५४ सदस्यपदांसाठी उद्या मतदान होणार आहे. त्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली असून कर्मचारी मतदान केंद्रांवर पोहोचत आहेत. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयात अपील झालेल्या प्रकरणांमुळे २ डिसेंबरला होणारं मतदान राज्य निवडणूक आयोगानं उद्यापर्यंत पुढे ढकललं होतं.

यवतमाळ, वाशीम, बारामती, अंबरनाथ, महाबळेश्वर, फलटण, कोपरगाव, देवळालीप्रवरा, पाथर्डी, नेवासा, फुरसुंगी- उरुळी देवाची, अनगर, मंगळवेढा, फुलंब्री, मुखेड, धर्माबाद, निलंगा, रेणापूर, बसमत, अनंजनगाव सूर्जी, बाळापूर, देऊळगावराजा, देवळी, घुग्घूस या नगरपरिषदा आणि नगर पंचायतींसाठी हे मतदान होणार आहे. याशिवाय विविध जिल्ह्यातल्या ७६ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींमधल्या १५४ सदस्यपदांसाठीही उद्या मतदान होणार आहे. या सर्व जागा तसंच २ डिसेंबरला मतदान झालेल्या ठिकाणांची एकत्रित मतमोजणी रविवारी होईल.

<><><><><>

माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिलेला मंत्रीपदाचा राजीनामा राज्यपालांनी स्वीकारला असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सकाळी मुंबईत वार्ताहरांना सांगितलं.

नाशिक जिल्हा न्यायालयानं सदनिका अपहार प्रकरणी दोषी ठरवून शिक्षा दिल्यानंतर त्यांनी काल राजीनामा दिला. नाशिक न्यायालयाच्या  शिक्षेला त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिलं असून आज त्यावर सुनावणी होणार आहे.

दरम्यान, कोकाटे यांची आज मुंबईच्या रुग्णालयात अँजिओग्राफी झाली. त्यांना अटक करण्यासाठी नाशिक पोलिस काल रात्रीच मुंबईत पोहोचले होते. सकाळी पोलिसांनी डॉक्टरांशी चर्चा केली आणि कोकाटे यांच्या प्रकृतीविषयी डॉक्टरांचा जबाब नोंदवून घेतला.

<><><><><>

सातारा जिल्ह्यात अंमली पदार्थ रॅकेट उघडकीस आणल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिसांचं अभिनंदन केलं आहे. मुंबईत जागतिक हिंदू आर्थिक मंचाच्या उद्घाटानानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. या अंमली पदार्थ प्रकरणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा किंवा त्यांच्या कुटुंबीयांचा कोणताही संबंध समोर न आल्याचंही त्यांनी सांगितलं.

***होल्ड... बाईट- देवेंद्र फडणवीस***

हिंदू आर्थिक मंचाच्या या परिषदेदरम्यान, बांगर उद्योग या सिमेंट उत्पादन कंपनीनं चंद्रपूर जिल्ह्यात दोन हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचं आश्वासन दिल्याची माहितीही त्यांनी दिली.

**<><><><><>**

६४ वा गोवा मुक्ती दिन आज साजरा होत आहे. १९६१ साली गोव्याला पोर्तुगीज राजवटीपासून स्वातंत्र्य मिळालं.

गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या हस्ते  आज पणजीत ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाला. नंतर पोलीस आणि इतर सुरक्षा दलांच्या संचलनाची मानवंदना त्यांनी स्वीकारली . गोव्याच्या नागरिकांनी निसर्ग सौंदर्यानं संपन्न असलेलं आपलं राज्य स्वच्छ ठेवण्याचा आणि इथली शांतता अबाधित ठेवण्याचा संकल्प करावा, असं आवाहन त्यांनी केलं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गोवा मुक्तीसाठी लढा देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांचा अढळ संकल्प आणि समर्पणाबद्दल आदर व्यक्त केला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अन्यायाविरोधात लढा देणाऱ्या शूर वीरांचं स्मरण केलं आहे. त्यांचं बलिदान सरकार आणि नागरिकांना गोव्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी काम करण्याची प्रेरणा देत आहे, असं त्यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे.

**<><><><><>**

जहाजं आणि बंदर सुविधांच्या सुरक्षेसाठी केंद्रसरकार ‘बंदर सुरक्षा ब्युरो’ ही वैधानिक संस्था स्थापन करणार आहे. ही संस्था सायबर सुरक्षेसह, बंदरांच्या एकूण सुरक्षेशी संबंधित माहितीचं कालबद्ध संकलन, विश्लेषण आणि देवाण घेवाण, यावर देखरेख ठेवेल, अशी माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज बंदरं आणि जहाजांच्या सुरक्षेसाठी समर्पित संस्थेच्या स्थापनेबाबत चर्चा करण्यासाठी बैठक बोलावली होती. या बैठकीला बंदरे,

जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल आणि नागरी विमान वाहतूक मंत्री के. राम मोहन नायडू उपस्थित होते.

**<><><><><>**

नागपूरमधल्या बुटीबोरी औद्योगिक वसाहतीत आज सकाळी पाण्याची टाकी कोसळून झालेल्या अपघातात किमान ३ जण ठार आणि ३ जण जखमी झाले. एका सौर पॅनल उत्पादन करणाऱ्या कारखान्याजवळ पाण्याच्या टाकीचं बांधकाम सुरु असताना अचानक ती कोसळल्यामुळे अनेक जण ढिगाऱ्याखाली अडकले असून बचावकार्य सुरु असल्याचं पोलिसांनी सांगितलं. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केलं आहे.

**//<><><><><>//**